# नियमीत दिवाणी दावा क्र. १२७/२०२१ निशाणी क्र. ०५ वरील आदेश

प्रस्तुतच्या दाव्यात वादी यांनी प्रस्तूत अर्जाव्दारे आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे प्रतिवादी यांच्या विरूध्द तात्पूरता मनाई हुकूम मिळावा अशी विनंती केली आहे.

**वादी यांचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणेः**

०२. वादी यांनी वाद मिळकतीबाबत प्रतिवादींविरुध्द कायम मनाई हुकूम मिळण्याकरिता दावा दाखल केला आहे. सदर अर्जाव्दारे वादी यांनी असे कथन केले की, वादी व प्रतिवादी हे एकाच गावचे रहिवाशी असुन गट क्र. ७४ वादीच्या मालकीचा आहे व त्यामध्ये वादी व त्यांच्या भावांची जमीन आहे. त्यापैकी १ हेक्टर १६ आर जमीन वादीच्या मालकीची आहे. यातील प्रतिवादी यांची जमीन वादीच्या कोणत्याही जमिनीलगत नाही. असे असतांना प्रतिवादी क्र. १ व २, प्रतिवादी क्र. ३ व ४, प्रतिवादी क्र. ५ व ७ हे परस्परांचे सख्खे भाउ आहेत. प्रतिवादी क्र. १ च्या मालकीचा मौजे गोद्री शिवारात जमीन गट क्र. ५८ व मौजे वरुड शिवारात जमीन गट क्र. ३३२ असुन त्यांना जाण्यासाठी गोद्री ते वरुड या शिवाने रस्ता असून सदर रस्त्याचा उपभोग प्रतिवादी आजही घेत आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी बेकायदेशीररित्या तहसिलदार भोकरदन यांचेकडे मौजे वरुड शिवारातील जमीन गट क्र. ३३२ व गोद्री शिवारातील जमीन गट क्र. ७७ मधुन जुना रस्ता मिळणे बाबत अर्ज दिला होता. वास्तविक पाहता गट क्र. ७४ मधुन वादीचे जमीनीतुन कोणत्याही प्रकारचा जुना रस्ता नाही. प्रतिवादींना जाण्या–येण्यासाठी पुर्वीच्या मौजे वरुड बुद्रुक शिवेने पुर्व–पश्चिम रस्ता हा गट क्र. ५८ व गट क्र. ७९, गट क्र. ६५ व गट क्र. ७५, गट क्र. ७६ च्या लगत असलेल्या शिवेने पुर्व–पश्चिम रस्ता आजरोजी अस्तीत्वात असुन गोद्री येथील गट क्र. ७२ मधुन उत्तर–दक्षिण पुर्ण रस्ता आजही कायम आहे. त्यामुळे नविन रस्ता देण्याचा प्रश्नच नाही. अशा परिस्थीतीत प्रतिवादीला वादीच्या

मालकीच्या गट क्र.७४ मधुन रस्ता पाडण्याचा कोणताही अधिकार नाही. तहसिलदार यांनी गट क्र. ७७ मधुन रस्ता मोकळा करुन देणेबाबत दिनांक ०२.०३.२०२१ रोजी संचिका क्र. २०१९ जमा–१/सिआर–४१ नुसार प्रतिवादीचा रस्ता मोकळा करुन देण्याबाबत केलेला आदेश हा चुकीचा असल्याने सदर आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी भोकरदन यांच्याकडे अपिल प्रलंबीत आहे.

०४. प्रतिवादी हे मुद्दामहुन जोडजमाव करुन वादीच्या मालकीच्या असलेल्या गट क्र. ७४ मधुन काही गावातील राजकारणातुन वादीला त्रास देण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या गट क्र. ७४ उत्तर–दक्षिण रस्ता पाडुन बळजबरीने गाडी बैलगाडी व जनावरे घालून सोयाबीन पिकाची नासाडी केली आहे. वादीने प्रतिवादी यांना ब–याच वेळा समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु दिनांक ११.०७.२०२१ रोजी प्रतिवादीने कु–हाड घेवुन ''तुझे यही खतम कर देंगे और जान से मार देंगे'' अशी वादी यांना धमकी दिली. त्यामुळे वादी यांना दावा दाखल करणे भाग पडले. वादी यांनी सकृतदर्शनी दावा सिध्द केला, दाव्याचे झुकते माप तिच्या बाजूने असून तात्पूरता मनाई हुकूम न मिळाल्यास तिचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे वादी यांनी तात्पूरता मनाईहुकूम मिळण्याची विनंती केली.

०५. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी निशाणी क्र. १२ वर त्यांचे म्हणणे दाखल करून दाव्यातील कथने अमान्य केली आहेत. प्रतिवादींनी कथन केले आहे की, प्रतिवादींनी गट क्र. ७४ मधुन बळजबरीने रस्ता पाडुन पिकाची नासाडी केली नाही. वाद जमिनीच्या बांधावरुन प्रतिवादी यांना वापरण्याकरिता दक्षिण–उत्तर पुर्वापार प्रतिवादींचा येण्या–जाण्याचा रस्ता होता, परंतु वादीने तो अडविला होता. त्यामुळे प्रतिवादींनी तहसिलदार मामलेदार भोकरदन यांच्याकडे अर्ज देवुन सदर रस्ता मोकळा करुन देण्याची विनंती केली होती . सदरील रस्त्याच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी यांनी दिनांक १५.११.२०१९ रोजी पंचनामा केला व सर्व बाजुची शहानिशा करुन मामलेदार भोकरदन यांनी प्रतिवादींना मौजे

गोद्री शिवारातील गोद्री ते वरुड जाणारा रस्ता असुन गोद्री गावापासुन गट क्र. ७१ पर्यत खडीकरण झालेला रस्ता अस्तीत्वात आहे. गट क्र. ७१ च्या पुढे गट क्र. ७२ व ७४ चे मालक वादी यांनी सदर रस्ता अडविला होता, त्यामुळे दिनांक ०२.०३.२०२१ रोजी तो रस्ता मोकळा करुन देण्याचा आदेश तहसिलदार यांनी दिला आहे. तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द वादीने एस.डी.एम. कार्यालय, भोकरदनकडे पुनर्विलोकन अर्ज सादर केला जो प्रलंबीत आहे. प्रस्तुत रस्त्यासंबंधीचा वाद तहसिलदार भोकरदन यांनी मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ प्रमाणे गट क्र. ७४ मधील रस्ता मोकळा करुन देण्याचा आदेश दिला आहे. सदरचा वाद मामलेदार कोर्टाने निकाली काढला आहे. त्यामुळे त्या आदेशाविरुध्द प्रस्तुत दावा दाखल करण्यास कलम २६ मामलेदार न्यायालयात अधिनियम १९०६ प्रमाणे प्रतिबंधीत करण्यात आलेले असल्याने सदरचा दावा चालवणे योग्य नाही, म्हणुन तो आदेश ७ नियम ११ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

०६. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांची कथने व सविस्तर युक्तीवादावरून खालील मुद्दे उपस्थीत होतात व त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापुढे नमूद केलेल्या कारणमीमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रथमदर्शनी दावा हा वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होय |
| ०२. | न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने आहे काय ? | होय |
| ०३. | मनाई हुकूमाचा आदेश त्यांच्या बाजुने न झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | होय |
| ०४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करिताः**

०७. वरील मुद्यांची पुनरावृत्ती टाकण्याकरिता ते एकत्रीत चर्चीले जात आहे.

०८. कायद्याची स्थापीत स्थिती अशी आहे की, तात्पुरता मनाई हुकूमाकरिता प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असून मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांची अपरिमित नुकसान होणार आहे, या तिन्ही बाबी वादी यांनी सिध्द करणे गरजेचे आहे.

०९. वादीच्या वकिलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे कथन केले आहे की, वादीच्या मालकीच्या गट क्र. ७४ मधुन कोणत्याही प्रकारचा रस्ता अस्तित्वात नसतांना बळजबरीने उत्तर–दक्षिण रस्ता पाडुन सोयाबीन पिकाची नासाडी केली आहे. वादीच्या गट क्र. ७४ मधुन कधीही कोणत्याही प्रकारचा रस्ता अस्तित्वात नव्हता. त्यामुळे प्रतिवादी यांना वादीच्या मिळकतीतुन कोणत्याही प्रकारचा रस्ता पाडण्याचा अधिकार नाही. मा. तससिलदार यांचा रस्ता मंजुरीचा अर्ज हा नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरोधात असल्याने प्रतिवादी यांनी वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये याकरिता निरंतर मनाईकरिता सदरचा दावा दाखल केला असुन तात्पुरता मनाई आदेश मिळणेकरिता सदर अर्ज दाखल केला आहे. यास्तव वादीने सदरचा अर्ज मंजूर करण्याविषयी विनंती केली आहे.

१०. प्रतिवादींनी यांनी त्यांच्या युक्तीवादात कथन केले आहे की, प्रतिवादींनी गट क्र. ७४ मधुन बळजबरीने रस्ता पाडुन पिकाची नासाडी केली नाही. वाद जमिनीच्या बांधावरुन प्रतिवादी यांना वापरण्याकरिता दक्षिण–उत्तर पुर्वापार प्रतिवादींचा येण्या–जाण्याचा रस्ता होता, परंतु वादीने तो अडविला होता. त्यामुळे प्रतिवादींनी तहसिलदार मामलेदार भोकरदन यांच्याकडे अर्ज देवुन सदर रस्ता मोकळा करुन देण्याची विनंती केली होती . सदरील रस्त्याच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी यांनी दिनांक १५.११.२०१९ रोजी

पंचनामा केला व सर्व बाजुची शहानिशा करुन मामलेदार भोकरदन यांनी प्रतिवादींना मौजे गोद्री शिवारातील गोद्री ते वरुड जाणारा रस्ता असुन गोद्री गावापासुन गट क्र. ७१ पर्यत खडीकरण झालेला रस्ता अस्तीत्वात आहे. गट क्र. ७१ च्या पुढे गट क्र. ७२ व ७४ चे मालक वादी यांनी सदर रस्ता अडविला होता, त्यामुळे दिनांक ०२.०३.२०२१ रोजी तो रस्ता मोकळा करुन देण्याचा आदेश तहसिलदार यांनी दिला आहे. यास्तव वादीचा दावा व सदरचा अर्ज हा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

११. तहसिलदार भोकरदन यांचे संचिका क्र. २०१९/जमा–१/सीआर.–४१ चे आदेशाचे अवलोकन केले असता वादीच्या गट क्र. ७४ मधुन रस्ता करून दिल्याचे तसेच सदर खडीकरण केलेला रस्ता बंद केल्याचे अहवाल पंचनाम्यात नमुद केल्याचे प्रत्यक्ष स्थळपाहणी अहवालात नमुद केले आहे. तसेच वादी यांनी अडविलेला रस्ता मोकळा करणे कामी मंडळ अधिकारी सिपोरा बाजार/पिंपळगाव रेणुकाई यांना आदेशीत करण्यात आले आहे. वादी यांच्या वकिलांच्या कथनानुसार, तहसिलदार यांचा सदरचा आदेश हा नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरूध्द आहे. त्यामुळे तहसिलदार भोकरदन यांचा आदेश नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून आहे किंवा नाही हे शाबीत करण्याकरिता दोन्ही पक्षांचा सखोल पुरावा नोंदविणे आवश्यक आहे. गट क्र. ७४ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यामधून कोणत्याही प्रकारच्या रस्त्याची नोंद असल्याचे दिसुन येत नाही. वादी यांनी कागदोपत्री पुराव्याच्या आधारे दावा मिळकतीतुन कोणताही जुना रस्ता अस्तित्वात नसल्याचे शाबीत केले आहे. वादीस प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजू हा वादीचे लाभात असुन सदरचा अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही.

१२. उपरोक्त विवेंचनावरून वादी यांनी प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने असल्याचे सिध्द केले आहे. तसेच मनाई हुकूम न मिळाल्यास वादीचे

अपरिमित नुकसान होणार आहे. म्हणून मुद्या क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्या क्र. ४ करिताः**

१३. मुद्या क्र. १ ते ३ वरील निष्कर्षा अन्वये वादी हे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरतात. यास्तव मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतीवादी किंवा त्यांच्या मार्फत कोणीही मौजे गोद्री, ता. भोकरदन, जि. जालना येथील जमीन गट क्र. ७४ जिचे क्षेत्रफळ ०४ हेक्टर ७२ आर पैकी वादीच्या स्वतंत्र मालकी व ताब्याची १ हेक्टर १६ आर जमीन जीची चतुःसिमा पुर्वेस फिरोज शहा मुनाफ शहा यांची जमीन, पश्चीमेस तुकाराम बावस्कर यांची जमीन, दक्षिणेस शेख यनुस शेख हुसेन यांची जमीन व उत्तरेस गट क्र. ६६ ची जमीन याप्रमाणे असून या चतुःसिमेच्या आतील जमिनीतुन कोणत्याही प्रकारचा उत्तर–दक्षिण रस्ता पाडुन दाव्याचा अंतीम निकाल होईपर्यत वादीच्या पिकांचे नुकसान करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम प्रस्तूत दाव्याच्या निकालापर्यत देण्यात येतो.

स्वाक्षरित/–

दिनांकः १२.०९.२०२२
भोकरदन.

(आर. व्ही. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः १२.०९.२०२२

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही